महासागर
रविवार, दि. 2 मार्च 2025
अमरावती
पान 3

# चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्याला 20 वर्षाची सक्तमजुरी

## चांदूर रेल्वे हद्दीतील चार वर्षापूर्वीची घटना

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.1 )** – चांदूर रेल्वे पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका पाच वर्षीय चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला न्यायालयाने 20 वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. मुख्य जिल्हा सत्र न्यायाधीश एस.व्ही. यार्लागड्डा यांच्या न्यायालयाने 1 मार्च रोजी हा निर्णय दिला. शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव रोशन नागोराव मारोटकर (रा. चांदुररेल्वे तालुका) आहे. ही घटना 13 फेब्रुवारी रोजी 2021 रोजी दुपारच्या सुमारास चांदुररेल्वे पोलिस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे.

विधी सुत्रानुसार, 13 फेब्रूवारी 2021 रोजी चांदूर रेल्वे पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रहिवासी 5 वर्षीय मुलगी घराबाहेर तिच्या मैत्रिणींसोबत खेळत होती. त्यावेळी आरोपी रोशनने पिडित मुलीसह तिच्या मैत्रिणीला हरभरा देण्याचे आमिष दाखवून घरी बोलावले. यानंतर, त्याने पीडितेच्या मैत्रिणीला घरी पाठविले आणि त्यानंतर पाच वर्षीय चिमुकलीवर लैंगिक अत्याचार केला. या घटनेनंतर पिडित मुलीने हा प्रकार तिच्या आईला सांगितला. त्यानंतर या घटनेच्या अनुषंगाने चांदूर रेल्वे पोलिस ठाण्यात आरोपीविरुध्द भादंविच्या कलम 376 (एबी), सहकलम 3, 4, 5 (एम), 6 पोक्सो ॲक्टनुसार गुन्हा नोंदविला. याप्रकरणात चांदुररेल्वे पोलिसांनी तपास पुर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या प्रकरणात आरोप सिद्ध करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे एकूण 13 साक्षीदार तपासण्यात आले.



त्यानंतर दोन्ही पक्षाच्या युक्तीवादानंतर आरोपीचा दोष सिध्द झाला. त्यानुसार मुख्य जिल्हा सत्र न्यायाधीश एस. व्ही. यार्लागड्डा यांच्या न्यायालयाने आरोपी रोशन मारोटकरला 20 वर्षे सक्तमजुरी आणि 15 हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. तसेच दंड न भरल्यास दोन महिन्यांची अतिरिक्त शिक्षा सुनावली. यासोबतच दंडाची रक्कम पीडितेच्या आईला देण्याचे आदेशित केले. याप्रकरणात सरकारच्या वतीने अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ॲड. शशीकिरण भगवतीप्रसाद पलोड यांनी प्रभावी युक्तीवाद केला. याप्रकरणात तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक गीता तागडे, पोलीस उपअधीक्षक जितेंद्र जाधव यांनी तपास केला. कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून एएसआय प्रवीण म्हाला, विजय वाट, मनोज देशमुख, अरुण हटवार यांनी सहकार्य केले.

# शिक्षकांवर स्कॉफ मूल्यांकनाचे ओझे

## 15 मार्चपर्यंतच मुदत, तिहेरी ओझ्याने जिल्ह्यातील शिक्षक त्रस्त



### या कामासाठी मुदतवाढ द्या!

हे काम प्रचंड वेळखाऊ असल्याने परीक्षांच्या तोंडावर पूर्ण करता येणे शक्य नाही. वार्षिक परीक्षा आल्या की कुठली ना कुठली कारकुनी कामे काढून शिक्षकांच्या माथी मारण्याचा शिरस्ता शालेय शिक्षण विभागाने यंदाही पाळला आहे. सध्या शिक्षकांवर बोर्डाच्या परीक्षा, क्षमतावृद्धी प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांना शिकविणे, असे तिहेरी ओझे आहे. त्यात या मूल्यांकनाची भर पडली आहे. या कामासाठी मुदतवाढ दिली पाहिजे.

**राजेश सावरकर**
**राज्य प्रसिध्दी प्रमुख**
**प्राथमिक शिक्षक समिती, अमरावती.**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.1 )** – राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) राज्यातील राज्य मंडळाच्या सर्व शाळांना शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा 28 फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. 128 मानके असलेल्या या आराखड्याची पूर्तता करण्याकरिता किमान 2 महिन्यांचा वेळ लागणार आहे. यामुळे परीक्षा घ्यायची की, हे काम करायचे, असा सवाल शिक्षकांनी उपस्थित केला आहे. आता 15 मार्चपर्यंतच वाढ दिली आहे. पण ती पण कमी पडणार आहे.

राज्यात सध्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा सुरू आहेत. या दोन्ही परीक्षा मिळून 27 हजार 894 पर्यवेक्षक तैनात आहेत. त्याशिवाय परिक्षेच्या इतर नियोजनातही राज्यातील विविध शिक्षकांचा सहभाग आहे. त्याचबरोबर एससीईआरटीने शालेय शिक्षकांसाठी नियोजित केलेले क्षमतावृद्धी प्रशिक्षण सुरू असल्याने अनेक शिक्षक या कामात व्यस्त आहेत. याचदरम्यान एससीईआरटीने स्थापन केलेल्या राज्य शाळा मानक प्राधिकरण कक्षातर्फे राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि व्यवस्थापनांच्या शाळांसाठी शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा तयार केला आहे. या आराखड्यात शाळांनी स्वयंमूल्यमापन करणे अपेक्षित आहे. त्याकरिता एससीईआरटीने मूल्यमापन पूर्ण करण्याकरिता 28 फेब्रुवारीपर्यंतची मुदत दिली होती.

तसेच एससीईआरटीने त्यासाठीचे मार्गदर्शनपर व्हिडिओची मागणी केली आहे. याचदरम्यान एससीईआरटीने स्थापन केलेल्या राज्य शाळा मानक प्राधिकरण कक्षातर्फे राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि व्यवस्थापनांच्या शाळांसाठी शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा तयार केला आहे. या आराखड्यात शाळांनी स्वयंमूल्यमापन करणे अपेक्षित आहे. त्याकरिता एससीईआरटीने मूल्यमापन पूर्ण करण्याकरिता 28फेब्रुवारीपर्यंतची मुदत दिली आहे. तसेच एससीईआरटीने त्यासाठीचे मार्गदर्शनपर व्हिडिओची मागणी केली आहे. यामुळे शिक्षक हैराण आहेत.राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषदेकडून व (एमसीईआरटी) 128 मुद्यांवरील माहिती शाळांच्या माथी मारण्यात आली. शाळांमध्ये झालेली चर्चासत्रे, इयत्तानिहाय झालेल्या पालक सभा, वार्षिक नियोजन, खेळातून शिक्षण, कथाकथन, अध्ययन अध्य निष्पत्तीवर आधारित उपक्रम, वृक्षारोपणासारखे उपक्रम, ई-लर्निंग साहित्याचा वापर आदींचा यात समावेश आहे.

# अल्पवयीन मुलावर चाकूने हल्ला

■ बसस्थानक मार्गावर घडली घटना
■ दोन अल्पवयीन मुलांविरुद्ध गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 1 )** – शहरातील बसस्थानक रस्त्यावरील एका कॅन्टीनमध्ये दोन अल्पवयीन मुलांनी 15 वर्षांच्या मुलावर चाकूने प्राणघातक हल्ला केला. ही घटना 28 फेब्रुवारी रोजी रात्री 7.30 वाजता घडली. जखमी व्यक्तीचे नाव मनीष शंकर खंडारे (15, रा. बेलपुरा) असे आहे. ओम सोळंके यांच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलिसांनी दोन अल्पवयीन मुलांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जखमी मनीष 28 फेब्रुवारी रोजी सायंकाळी ओम सोळंके आणि एका मुलासह कॅन्टीनमध्ये आला होता. दोघांनीही उसाचा रस प्यायला आणि बोलू लागले. यावेळी दोन्ही आरोपी अल्पवयीन



मुले तिथे पोहोचली. त्याने सिगारेट आणि चहा घेतला आणि ते मनीषशी मस्करी करू लागले. त्यावेळी तू माझी चेष्टा का करत आहेस?, असे मनिषने म्हटले. त्यानंतर एका अल्पवयीन मुलाने चाकू काढून त्याच्या पोटात वार केला. ज्यामुळे पोटातून रक्तस्त्राव सुरू झाला.

त्यानंतर सदर अल्पवयीन मुलाने इतरांना बोलावले आणि तेथून मोटारसायकलवरून पळून गेला. त्यानंतर ओम सोळंके आणि आणखी एका व्यक्तीने मनीषला इर्विन रुग्णालयात दाखल केले. पण मनीषची प्रकृती गंभीर झाल्यामुळे त्याला पीडीएमसी रुग्णालयात रेफर करण्यात आले. जिथे मनीषवर उपचार सुरू आहेत. ओम सोळंके यांच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलिसांनी दोन अल्पवयीन मुलांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# बेपत्ता झालेल्या तेरा वर्षीय मुलाला शोधले आठ तासात

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 1 )** – घरातून निघून गेलेल्या तेरा वर्षीय बालकाला शोधण्यात मोर्शी पोलिसांना आठ तासात यश मिळाले. पोलिसांनी बालकाला आई-वडिलांच्या स्वाधीन केले आहे.

1 मार्च रोजी 40 वर्षीय व्यक्तीने पोलिसांना माहिती दिली की, त्यांचा 13 वर्षीय पुतण्या 28 फेब्रुवारी रोजी कोणाला काही न सांगता कोठे तरी निघून गेला व तो रात्री घरी परत आला नाही. या माहितीवरून मोर्शी पोलीसांनी भारतीय न्याय संहिता कलम 137 (2) अन्वये गुन्हा नोंद करून तपासात घेतला. पोलिस निरिक्षक नितीन देशमुख यांनी सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवून तात्काळ गुन्हे प्रकटीकरण पथकाला पिडीत मुलाला शोधण्याचे निर्देश दिले. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण पथक प्रमुख पोलिस उपनिरीक्षक अमोल बुरकुल तसेच अंमलदार छत्रपती करपते, स्वप्नील बायस्कर यांनी मुलाचा शोध सुरू केला व अवघ्या आठ तासामध्ये त्याचा शोध घेवून त्यास दुर्गवाडा शिवारामधुन ताब्यात घेतले. पोलिसांनी बालकाला त्यांच्या पालकांच्या स्वाधीन केले. सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक अमोल बुरकुल, पोलीस अंमलदार छत्रपती करपते, स्वप्नील बायस्कर, पंकज साबळे, विलास कोहळे यांनी केली.

# सील केलेल्या फ्लॅटवर ताबा

**अमरावती** – अर्जुन नगर परिसरातील सिल केलेल्या फ्लॅटवर अनधिकृतरित्या ताबा घेण्यात आल्याची घटना 28 फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. अशोक सुंदरलाल रोचलानी आणि किरण रोचलानी यांनी त्यांचा फ्लॅट गहाण ठेवून कर्ज घेतले होते. परंतु कर्ज न भरल्याने कोर्टाच्या आदेशानुसार फ्लॅट सील करण्यात आला. परंतु आरोपींनी सील तोडून फ्लॅटवर बेकायदेशीरपणे ताबा घेतला. याप्रकरणात नंदकुमार हराळे यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी अशोक रोचलानी आणि किरण रोचलानी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# डायल 112 वर खोटी माहीती देणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

## शेंदुरजनाघाट ठाण्याच्या हद्दीतील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 1 )** – पोलिस विभागाच्या डायल 112 या क्रमांकावर खोटी माहिती देणार्या एका व्यक्तीविरुध्द शेंदुरजना घाट पोलिसांनी 28 फेब्रुवारी रोजी गुन्हा नोंदविला.

27 फेब्रुवारी रोजी रात्री पोलिस नियंत्रण कक्षातील डायल 112 या क्रमांकावर कॉल आला की, सदर ठिकाणी खुन झाला आहे. अशी माहिती मिळाल्याने सहायक पोलिस निरीक्षक दिपक महाडीक यांच्यासह पोलिस हवालदार विष्णु पवार व डायल 112 चे चालक पोलिस हवालदार निलेश वासनकर याच्यासह घटनास्थळी होवुन घटनास्थळी राजेन्द्र मोघे आय.टी.आय कॉलेज धनोडी रोड, मलकापुर येथे जावुन झाले. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन चौकशी केली असता कोणताही अनुचित प्रकार घडला नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पोलिसांनी कॉलर यांचे मो.नं 9022076873 वर संपर्क केला असता मोबाईल बंद दाखवित होता. त्यानंतर 28 फेब्रुवारी रोजी पोलिसांनी त्याच मोबाईल क्रमांकावर संपर्क केला असता, सदर मोबाईल नंबरवरून विनोद वासुदेवराव बालपांडे (वय 45 वर्ष रा. सिंगारखेडा पोस्ट डोरली ता. नरखेड जि.नगापुर, ह.मु राजेन्द्रजी मोघे आय.टी.आय कॉलेज धनोडी रोड, मलकापुर) यांनी फोन केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पोलिसांनी संबंधित व्यक्तीला खुन झाल्याबाबतची माहीती दिली होती का? असे विचारले असता त्यांनी 27 फेब्रुवारी रोजी दारूचे नशेत डायल 112 खुन झाल्याबाबत खोटी माहीती दिल्याचे सांगितले.

त्यानंतर पोलिसांनी विनोद वासुदेवराव बालपांडे याने लोकसेवकाला खोटी माहीती दिल्याने त्यांचे विरूध्द कलम 212 भारतीय न्याय संहीता 2023 प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे असुन तपास सुरू आहे. डायल 112 वर खोटी माहीती दिल्यास गुन्हा नोंद होवुन कारवाई करण्यात येईल. त्यामुळे कुणीही खोटी माहिती देऊ नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# व्यापारी संकुलातील 10 गोदामांत चोरी

**बेलोरा परिसरातील घटना | धान्य आणि औषधींची चोरी**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 1 )** – लोणी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बेलोरा येथील व्यापारी संकुलातील 10 गोदामांचे शटर चोरट्यांनी फोडले आणि धान्य आणि औषधी चोरून नेल्या. याप्रकरणात लोणी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. बेलोरा विमानतळ रस्त्यावरील व्यापारी संकुलात असलेल्या 10 गोदामांचे शटर आणि भिंती तोडून चोरट्यांनी पूर्ण नियोजनाने हा मोठा गुन्हा घडवून आणला. चोरांच्या टोळीने लाखो रुपयांचे धान्य आणि औषधांचा साठा चोरून नेला. त्यामुळे व्यापाऱ्यांमध्ये भितीचे वातावरण आहे. या घटनेच्या माहितीवरून लोणी पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. मिळालेल्या माहितीनुसार, पाच दुकानांमध्ये चोरांना काहीही सापडले नाही. पोलिसांनी इतर दुकानांमधून चोरीला गेलेले तांदूळ आणि औषधे जप्त केली आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात चोरी उघडकीस आल्यानंतर, चोरट्यांनी खूप नियोजन आणि पाळत ठेवून ही घटना घडवून आणल्याचा अंदाज आहे.

# भरधाव ट्रॅक्टर ट्रॉलीची धडक लागून युवकाचा मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर, ( दि. 1 )** – जैनपूर शेतशिवारात लगत ट्रॅक्टर ट्रॉलीची धडक लागून 33 वर्षीय युवकाचा मृत्यू झाला. ही घटना शुक्रवार (दि.28) रोजी रांत्री साडेसात वाजता दरम्यान घडली आहे.

उज्वल प्रकाश गावंडे (वय.34) रा.जैनपुर असे अपघातातील मुतकाचे नाव आहे. घटनेच्या वेळी उज्वल हा गावच्या बाहेर शौचालय विधी आटोपून शेतशिवारातील एका रखवालदाराच्या खाटेवर बसला



असताना त्याचवेळी चालक दिनेश मधूकर शेळके लाल रंगाची टॅक्ट्रर ट्रॉली एम.एच.27 बी.व्ही 5532 भरधाव व निष्कळजीपणे चालवून उज्वलच्या अंगावरून नेली. घटनेची माहिती मिळताच कुटुंबातील सदस्यांनी जखमी अवस्थेत उपचारासाठी तातडीने दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयात आणले. मात्र डोक्याला जबर मार लागल्याने डॉक्टरांनी मृत घोषीत केले. दरम्यान शुक्रवारी रात्री येवदा पोलीसांनी घटनास्थळी भेट देवून पंचनामा करुन अपघातग्रस्त टॅक्ट्रर-ट्रॉली ताब्यात घेतली आहे. विकास गावंडे यांच्या तक्रारीवरून शनिवारी चालक दिनेश शेळके यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दुसऱ्यादा वीज चोरी करताना पकडले

**अमरावती** – राजापेठ पोलीस स्टेशन परिसरातील महावीर नगर येथील रहिवासी कृष्णा रामलखन प्रजापती (40) यांनी त्यांच्या घरातील वीज मीटरमध्ये छेडछाड करून एकूण 2311 युनिट वीज चोरी केली. त्याची किंमत 57 हजार 140 रुपये आहे. आरोपीने ही रक्कम महावितरणला दिली आहे. भरारी पथकातील श्रीकांत तळेगावकर यांच्या तक्रारीवरून कृष्णा प्रजापतीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दिड लाखांचे तार चोरी

**अमरावती** – गाडगेनगर पोलीस स्टेशन परिसरातून चोराने दिड लाख रुपये किमंतीचे तार चोरून नेले. राजेश वानखडे यांच्या फार्म हाऊसच्या मागे नीलेश ठाकरे आणि सुभाष राठी यांची मालमत्ता आहे. तेथून नितीन वाघमारे, वरुण मालू, सूरज तलडा यांनी प्लॉटवर बसवलेले लोखंडी कंपाऊंड चोरून नेले, असा आरोप करण्यात आला आहे. चौकीदार सुदाम चव्हाण यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# 3 मार्चला जाहीर ई-सुनावणी

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 1 )**– एकूण महसूली गरज व प्रस्तावित वीज दराच्या निश्चितीकरणासाठी महावितरण कंपनीने दाखल केलेल्या बहुवार्षीक वीजदर याचिकेवर मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या वतीने सोमवार, दि. 3 मार्च रोजी अमरावती येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील 'नियोजन भवन' येथे जाहीर ई-सुनावणी होणार आहे. या सुनावणीला सकाळी 10.30 वाजता प्रारंभ होईल.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण कंपनी) चे आर्थिक वर्ष 2022-23 व आर्थिक वर्ष 2023-24 चे अंतिम अचूक समायोजन, आर्थिक वर्ष 2024-25 चे तात्पुरते समायोजन व आर्थिक वर्ष 2025-26 ते 2029-30 या पाचव्या नियंत्रण कालावधीसाठी मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे दाखल केलेल्या बहुवार्षीक वीजदर निश्चितीकरण याचिकेवर ही जाहीर ई- सुनावणी होणार आहे.

# लग्नसमारंभांमध्ये वाढला डीजेचा आवाज

## कारवाई कडे पोलिसांचे दुर्लक्ष

**महासागर प्रतिनिधी**
**पथ्रोट,( दि.1 )** – विधानसभा निवडणुकीचा धुरळा खाली बसतो न बसतो तोच आता लग्नसराईचा धुमधडाका सुरू झाला आहे. विशेष म्हणजे लग्नाच्या अगोदरच्या दिवशी डीजेच्या तालावर देवतांच्या पाया पडण्याचा कार्यक्रम आता नव्याने सुरू झाला आहे. त्यात पारंपरिक वाद्ये मागे पडली असून डीजेचा आवाज प्रचंड वाढला आहे. आवाजाची मर्यादा ओलांडणाऱ्या डीजेंवर कोणतीही कारवाई होताना दिसत नाही.

निवडणुकीत विजयी उमेदवारांच्या कार्यकर्त्यांकडून सर्रासपणे डीजेचा वापर झालेला पाहायला मिळाला. त्याच पार्श्वभूमीवर सध्या लग्नसमारंभातही डीजेने आवाजाची मर्यादा ओलांडली आहे. लग्नसराईत पारंपरिक



वाद्यांचा वापर बंद झाला असून त्याची जागा डीजेने घेतली आहे. डीजे नसेल तर लग्न होत नसल्याची भावना वाढीस लागली आहे. विशेष म्हणजे भयंकर आवाजामुळे डीजे हा आरोग्यासाठी घातक ठरू लागला आहे. डीजेच्या आवाजाने ध्वनिप्रदूषणाचा प्रश्न निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. सरकारी यंत्रणांच्या वरदहस्ताने सर्वत्र डीजेचा दणदणाट सुरू आहे. विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांना तसेच प्रशासनातील सर्व अधिकाऱ्यांना लग्नकार्यात आल्यानंतर याचा त्रास होतो. मात्र, यावर कोणीही काहीही बोलण्यास तयार होत नाही. पोलिस प्रशासन यावर कारवाई करीत नसल्याने डीजेच्या चालकांचा आवाज वाढला आहे. ध्वनिप्रदूषणा बाबत कोणीही काही बोलण्यास तयार नाही, अशी स्थिती आहे.

### शासनाने घेतली बघ्याची भूमिका

ध्वनिप्रदूषणाचे सर्रास उल्लंघन होत असतानाही प्रशासनाने घेतलेली बघ्याची भूमिका आश्चर्यचकित करणारी आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश पायदळी तुडविले जात असल्याचे दिसून येते. लग्नसमारंभ हे सध्या इव्हेंट झाले असून, लाखो-करोडो रुपयांची उधळण होत आहे. त्याचबरोबर डीजेच्या भिंतीही मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. राज्य मार्गावरील लग्नकार्यालयात सर्वाधिक डीजे लावण्याचे चित्र सर्रास पाहायला मिळत आहे.

### ज्येष्ठांसह लहान मुलांना त्रास

ध्वनिप्रदूषणाच्या सर्व मर्यादा ओलांडत स्पीकरच्या भिंतींनी दहशत निर्माण केली जात आहे. याचा त्रास ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना होत आहे. पोलिस यंत्रणा अशा डीजेवर कारवाई करताना दिसत नाही. त्यामुळे डीजेचालकांची मनमानी वाढली असून, कानठळ्या बसणारा आवाज परिसरात दणाणून सोडला जात आहे.

### न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन

डिजे हा आरोग्यासाठी घातक ठरू लागला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार औद्योगिक क्षेत्रामध्ये दिवसा 75 डेसीबल , रात्रीच्यावेळी 70 डेसीबल, व्यवसायिक क्षेत्रात दिवसा 65 डेसीबल, रात्री 55 डेसीबल, रहिवासी क्षेत्रात दिवसा 55 डेसीबल,आणि रात्री 45 डेसीबल, शांतता क्षेत्रात म्हणजे शाळा, कॉलेज, रुग्णालय तसेच शासकीय कार्यालया समोर दिवसा 50डेसीबल, रात्री 40 डेसीबल आवाजापुढे कोणीही वाजवू शकत नाही. पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात मर्यादेपेक्षा जास्त आवाजात कोणीही डिजे वाजविला तर त्यांच्या विरुद्ध कठोर कारवाई करू असे काही ठाणेदार मोघमपणे सांगतात.

# कत्तलीसाठी नेणाऱ्या 11 गाईंना जिवनदान

## शेंदुरजनाघाट पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.1 )** – कत्तलीसाठी नेत असलेल्या 11 गोवंश जनावरांना शेंदुरजनाघाट पोलिसांनी जीवनदान दिले. शुक्रवारी पहाटे 5 वाजता पुसला ते धनोडी रस्त्यावरील एका वाहनावर ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी जनावरे व वाहन असा एकूण 4 लाख 46 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पुसला ते धनोडी रस्त्यावर वाहन क्रमांक एमएच 04 एफयु 3293 मध्ये गोवंश जनावरांची तस्करी होत असल्याची गोपनीय माहिती शेंदुरजनाघाट पोलिसांना



मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी धनोडी रस्त्यावर सापळा रचला. पोलिसांना पाहताच चालक वाहन सोडून तेथून पळून गेला. पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता, वाहनात 11 जनावरांना क्रूरपणे कोंबून ठेवल्याचे आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी गोवंश जनावरांची सुटका करून, त्यांना गोरक्षणात पाठविले. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अतिरिक्त पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक महाडिक, दिलीप घोडे, विष्णू पवार, नीलेश वासनकर, सागर लेवरकर, रोहित खेर्डे यांनी केली.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# रवी नगरमध्ये गटार आणि कचऱ्याचा संगम




अमरावती - रवी नगर येथील पुलाचे बांधकाम सुरु आहे. तसेच नाल्याचेही बांधकाम सुरु आहे. परंतू या नाल्यात इतका कचरा झाला आहे की, येथे गटाराचे पाणी आणि कचऱ्याचे संगम असल्याचे भासत आहे. हा कचरा काढायला स्वच्छता कर्मचारी कधीही आले नाही. परिसरात कचरा उचलणाऱ्या गाड्या किंवा दारांवर घंटा गाड्या येत नसल्याने नागरिकांनी या नाल्यालाच कचरा कुंडी केले आहे. महापालिका प्रशासनाने या कचऱ्या संबधात तातडीने उपाययोजना कराव्यात अथवा मनपाला कुलूप लावले असल्याचे घोषीत करावे, अशी मागणी केली आहे. छायाचित्र - प्रशांत टाके

# सुराज्य निर्माण करण्यात युवकांची भूमिका महत्वपूर्ण



**बच्चू कडू यांचे प्रतिपादन**

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपुर, ( दि.1 )**– तरुणांनी रक्तदान चळवळीसारख्या समाजोपयोगी व मानवतापूर्ण उपक्रमांमध्ये सहभागी होणे आज काळाची गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी तरुण मावळ्यांच्या सहकार्यानेच स्वराज्याची निर्मिती केली होती. आजही स्वराज्याचे सुराज्य करायचे असेल तर, त्यासाठी तरुणांची भूमिका महत्वाची आहे. असे प्रतिपादन माजी मंत्री बच्चु कडू यांनी केले. संतांची शिकवण अंगी बाळगून युवकांनी स्वार्थासोबत परमार्थही करावा, असे आवाहनही बच्चू कडू यांनी यावेळी केले.

संत गाडगेबाबा ज्ञानसागर वाचनालयात छत्रपती शिवाजी महाराज व संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त गाडगे बाबा पानेरी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी उद्घाटक म्हणून बच्चू कडू बोलत होते. अध्यक्षस्थानी विजय थवानी होते. महापुरूषांच्या प्रतिमा पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. या शिबीरात 54 विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन रक्तदान केले. त्यात आकाश बोंडे, शिरीष उमाळे, आदित्य कुकडे, सुमित गुर्जर, अजय चव्हाण, प्रणव लहाने, नितीन गुप्ता, सुमित कोथले, अल्पेश निचत, विकास देशमुख, शिवम कोयते, ऋतिक वानखडे, अभिजीत जाधव, तेजस गाठे, भूषण सावरकर, दिनेश कळसकर, वैष्णवी मोटधरे, रेणुका देशमुख, सुमित वन्हेकर, प्रगती आवनकर, अमित लहाने, निखिल खारपकर, सचिन धाबेकर, विजय धांडगे, अंकित कडू, रुषभ चित्रकार, रुपेश गवई, यश दैनिककर, गौरव लवटे, रजत राऊत, नागोराव राऊत, राम कस्तुरे, तेजस घोडे, संदिप गुळदे, अंकुश सरोदे, गोपाळ वालखडे, संजय पवित्रकर, मंगेश लोखंडे, दिपक पोटे, अमित झाडे, दिपेश काकोडे, रुषिकेश वढाळे, प्रणव लहाने, रामरतन झाडे यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे संचालन सुमित कोठोळे तर आभार प्रदर्शन गोकुल पळसपगार यांनी केले.

# पाईपलाईनच्या कामात वनविभागाचा खोडा

## पाणीटंचाईत मंजूर झालेला निधी अखर्चीक | मसोंडीवासी पित आहेत गढूळ पाणी

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी( दि.1 )**– मागील एक वर्षापासून मसोंडी गावात पाणीटंचाई निर्माण झाली होती. त्यामूळे सरपंच, सचिव यांच्या पाठपुराव्याने जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाने गावात शुद्ध पाण्याचा पुरवठा व्हावा म्हणून दोन किलोमीटरची पाईपलाईन मंजूर करून 19 लक्ष रुपयांचा अंदाजपत्रक तयार केला व प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. मात्र वनविभागातील अधिकाऱ्यांनी या पाईपलाईनसाठी आमच्या जंगलातून खोदकाम करायचं नाही म्हणून खोडा घातला. त्यामुळे सदर पाईपलाईनचे काम बंद पडले आहे. त्याकरिता गावातील सरपंच, उपसरपंच यांनी चिखलदरा येथे झालेल्या आमसभेत हा मुद्धा मांडला.




चिखलदरा तालुक्यातील मसोंडी हे अतिदुर्गम भागात वसलेले गाव गावाची लोकसंख्या अंदाजे 850 च्या आसपास आहे. गाव डोगरावर असल्याने उन्हाळ्यात नेहमीच पाणीटंचाई चा सामना करावा लागतो. गावातील पाणीपुरवठा करणारी जुनी पाईपलाईन अतिशय जीर्ण झाल्यामुळे व त्यातून नागरिकांना गढूळ पाणी पुरवठा होत असल्याने नवीन पाईपलाईन पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद अमरावती कडून 19 लाख रुपयांचे अंदाजपत्रक तयार करून घेतले. प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली, मात्र वनविभागातील अधिकाऱ्यांनी या कामात खोडा घातला. ही पाईपलाईन आमच्या जंगलातून जात आहे, त्यामूळे खोदकाम करायचे नाही म्हणत काम बंद पाडले. त्यामुळे एक वर्षापासून मंजूर झालेला निधी अद्यापही तसाच पडून आहे. गावातील जुन्या व जीर्ण झालेल्या पाईपलाईन द्वारेच पाणीपुरवठा सुरू असून ती रोजच कुठे ना कुठे फुटते व लिकेज मधून नागरिकांना दूषित पाण्याचा पुरवठा सुरू आहे. या प्रकारामूळे येथे साथरोग पसरण्याची भीती निर्माण झाली आहे. वरिष्ठांनी या गंभीर बाबीची दखल घेऊन गावकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी होत आहे. अन्यथा वनविभाग व गावकरी यांच्यात संघर्ष निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

> सदर पाईपलाईन हे संपूर्ण शेतकऱ्यांच्या शेतातून जात आहे वनविभागाच्या जंगलाचा पाईपलाईनशी काही एक संबंध येत नाही, तरीही वनविभाग खोडा घालत आहे. तरीही आम्ही वनविभागाच्या अधिकाऱ्यांना एक वर्षापासून परवानगी मागत आहो, पण कुणीही ऐकण्याच्या मनस्थितीत नाही. असे मसोंडी गावाचे सरपंच आरती सुरेश बेलसरे व उपसरपंच रेखा मारोती गायन यांनी सांगितले.

# लक्ष्मणराव राऊत यांचे निधन

**चांदूर रेल्वे, ( दि.1 )** – शेतकरी चळवळीतील सक्रिय नेते, मुळचे कळमजापुरचे रहिवासी लक्ष्मणराव नामदेवराव राऊत यांचे वयाच्या 93 व्या वर्षी शनिवारी (ता. 1) दु:खद निधन झाले. त्यांच्या मागे 3 मुली, सून नातू, जावई असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्यावर रविवारी कळमजापुर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.



# स्व. गजेंद्र खानझोडे स्मृती प्रित्यर्थ रक्तदान शिबिर

## रुग्णवाहिकेचे लोकार्पण व काव्य गायनाचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर,( दि.1 )** – स्व. गजेंद्र खानझोडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विविध कार्यक्रमांचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या खासदार रक्तदान अभियानाअंतर्गत रक्तदान शिबिर पार पडले. यावेळी रुग्णांच्या सुविधेसाठी रुग्णवाहिकेचे लोकार्पणही करण्यात आले. राष्ट्रभक्ती काव्य गायन या कार्यक्रमात नामवंत कवींनी सहभाग घेतला.



शहरातील हॉटेल मयुरी इन येथे डॉ. कमल अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली रक्तदान शिबिर पार पडले. यावेळी रक्तदात्यांना भेट म्हणून हेल्मेट देण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रभु जवंजाळ आणि मनोहरलाल गिडवाणी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विनय चतुर, शाम आसोलकर, मिलिंद हेडाऊ, गजानन चापके, विजय मिश्रा, मंगला पोंदे, दिपाली पारधी, मोनी इरशाद, तसेच विदर्भ केसरी कुस्तीपटू तन्वी माथने यांचा सत्कार करण्यात आला. रक्तदान शिबिरात मोठ्या संख्येने रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन रक्तदान केले.

दुपारी कवी सुमित ओरछा, उज्वल अग्रवाल आणि सिया परिहार यांचे राष्ट्रभक्तीवर आधारित काव्य गायन झाले. त्यानंतर रुग्णांच्या सुविधेसाठी रुग्णवाहिकेचे लोकार्पण आ. प्रवीण तायडे, आ. केवलराम काळे व युवा स्वाभिमानीचे पदाधिकारी सुनील राणा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रताप अभ्यंकर, गजानन कोल्हे, विशाल काकड, कुंदन यादव, पुरुषोत्तम लकडे, मदन बिसणे, सुनील अंजनकर, अजय माथणे, छोटू लाडोळे आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन सुनील खानझोडे बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, वाघामाता संस्थान, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, जगदंबा व्यायाम शाळा, नवरंग नवदुर्गा उत्सव मंडळ, बागेश्वर सेवा समिती आणि सकल हिंदू समाजाच्या वतीने करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मनोज भुजाडे, कमल अग्रवाल, मदन बिसणे, सुनील खानझोडे, सोमेश खानझोडे, पवन जडीए, प्रफुल्ल कुरेकर, अक्षय अधवाल, कमलेश भागोले, ललित ठाकूर, अक्षय पाठक, आशिष मिश्रा, पंकज गुप्ता, लखन भिडे, भारत भिडे, सोहम मेश्राम, चेतन पुरोहित, विलास बेलसरे, प्रमोद नैकिले आदींनी परिश्रम घेतले.

# आज दर्यापूर येथे शिवसेना ठाकरे गटाचा मेळावा

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.1 )** – दर्यापूर मतदार संघातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांचा मेळावा उद्या, रविवारी दुपारी 12 वाजता अकोट मार्गावरील बाजार समितीच्या कृषी भवनात आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी अकोला जिल्ह्यातील आमदार व पक्षाचे उपनेते नितीनबापू देशमुख हे राहतील. या मेळाव्यात दर्यापूरचे नवनिर्वाचित आमदार गजानन लवटे यांचा सत्कार करण्यात येणार आहे. मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपनेते व संपर्कप्रमुख सुधीर सूर्यवंशी, माजी खासदार अनंत गुढे, जिल्हाप्रमुख पराग गुडधे, महिला आघाडीच्या सह संपर्कप्रमुख प्रतिभा बोपशेट्टी, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख अलका पारडे, युवासेनेचे जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर, उपजिल्हाप्रमुख महेंद्र दिपटे, सहकार सेनेचे जिल्हाप्रमुख अरुण खारोडे, विधानसभा संघटक बबन विल्हेकर, प्रमोद पाटील गिरनाळे, मनीषा टेंभरे आदी उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्याला दर्यापूर व अंजनगाव सुर्जी तालुक्यातील शिवसेना उबाठा पक्षाच्या शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन दर्यापूर तालुकाप्रमुख प्रमोद धनोकार, अंजनगाव तालुका प्रमुख कपिल देशमुख, दर्यापूर शहर प्रमुख गोपाल अग्रवाल, अंजनगाव सुर्जी शहर प्रमुख राजू आकोटकर यांच्यासह युवा सेना, महिला आघाडी व सहकार सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# पोटे अभियांत्रिकीच्या तीन विद्यार्थ्यांची ‘प्लॅनेट स्पार्क’ मध्ये निवड

## कॅम्पस प्लेसमेंट मधून मिळविले यश



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.1 )** – अमरावतीच्या पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा आपले कौशल्य सिद्ध केले आहे. नुकत्याच झालेल्या कॅम्पस प्लेसमेंट मधून महाविद्यालयातील तीन विद्यार्थ्यांची पुण्यातील प्रसिद्ध ‘प्लॅनेट स्पार्क’ या कंपनीत निवड झाली आहे. या निवडीमुळे महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलने एक महत्त्वाचा टप्पा सुद्धा गाठला आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये सय्यद सुफियान, वैष्णवी जायले आणि अपेक्षा गडपायले यांचा समावेश असून त्यांना 6.64 लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज मिळाले आहे. या विद्यार्थ्यांनी परिश्रमाच्या बळावर विविध मुलाखतींच्या फेऱ्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत हे यश प्राप्त केले आहे.

‘प्लॅनेट्स स्पार्क’ ही एक मध्यस्थ तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म कंपनी आहे. जी केजी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसह व्यावसायिकांना इंग्रजी संप्रेषण, सार्वजनिक वक्तव्य, व्याकरण, सर्जनशील लेखन, वादविवाद, ब्लॉगिंग आणि इतर नवीन युगातील कौशल्यांवर ऑनलाइन शिकवणी प्रदान करते. या यशाबद्दल तिन्ही विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे संचालक डॉ. पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया, उपप्राचार्य डॉ. मो. झूहेर, रिलेशन डीन प्रा. मोनिका जैन, प्लेसमेंट ऑफिसर प्रा. प्रतीक भट्टड, विभाग प्रमुख विजय गडीचा, डॉ. एस. एस. सराफ, सुहास पवार, प्रा. प्रतिक यावले, प्रा. योगेश शेलोकार, प्रा. दीपक धनवाणी यांनी अभिनंदन केले आहे.

# बहुउपयोगी पाटा-वरवंटा इतिहासजमा होण्याच्या मार्गावर

## निर्मिती कला लुप्त होण्याची भीती ■ वडर समाजाच्या पिढीजात व्यवसायाला घरघर

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट, ( दि. 1 )** – पाट्यावरवंट्याची जोडी नुसती अन्नपूर्णा देवीचीच मदत करत नसे, तर घरात कोणाला दुखलंखुपलं की झाडपाल्याची औषधं ठेचून, रगडून प्रथमोपचाराचं कार्यही करत असे. हल्ली पिठाच्या गिरण्या, मिक्सरच्या युगात जातं, पाटा-वरवंटा या बहुउपयोगी वस्तूंना मागणी कमी झाली आहे. या पारंपारिक वस्तू जणू इतिहासनमा होण्याच्या मार्गावर आहेत. पिढ्यानपिढ्या चालत आलेला हा व्यवसाय लुप्त होणार, अशी शक्यता निर्माण झाली आहे. प्रामुख्याने दगडापासून वस्तू बनविण्याचे काम करुन चरितार्थ चालविणाऱ्या वडर समाजाच्या या व्यवसायाला घरघर लागल्याचे दिसून येते. मात्र तरीही या समाजातील लोक आजही रस्त्याच्या कडेला, यात्रेत खलबत्ते, जातं, पाटा - वरवंटा साकारत विक्री करताना दिसतो.




लहान-मोठ्या दगडांना कधी छन्नी आणि हातोड्याने आकार देत बसलेला वडार समाज आजच्या डिजिटल युगात आपला परंपरागत व्यवसाय जपण्याचा प्रयत्न करतो. शहरातील रस्त्याच्या कडेला, यात्रेत प्लास्टिकच्या छताचा आडोसा करून ऊन-पावसातही हा समाज दगडांना आकार देत असतो. दगडासारख्या कठीण वस्तूपासून जाते, उखळ, पाटा, वरवंटा, खलबत्ता आदी वस्तू घडवून त्याच्या विक्रीद्वारे मिळणा ?या मोबदल्यात आपला चरितार्थ कसाबसा चालवणार्या वडर समाजाचा व्यवसाय धोक्यात आल्याने त्यांच्यासमोर आर्थिक संकटेही निर्माण झाली आहेत.

स्वयंपाक घरात मिक्सर आल्यामुळे घरातील उखळ, पाटा-वरवंटा, खलबत्ता या वस्तूंचा वापर कमी झाला आणि हळूहळू या सर्व वस्तू अडगळीत गेल्या. शिवाय अनेक वर्षे टिकणार्या असल्यामुळे एकदा विकत घेतल्या की फुटेपर्यंत पुन्हा नवीन घ्यायची गरजच पडत नाही. त्यामुळे आजही अनेकांच्या घरातील जाते, उखळ, पाटा, वरवंटा, खलबत्ता हा 30 ते 50 वर्ष किंवा अगदी त्या पूर्वीचा देखील असू शकेल. वडार समाजामध्ये माती काम करणारे आणि दगड काम करणारे असे दोन प्रकार आहेत. बहुतांश लोक घरे, इमारती, रस्ते आदीच्या बांधकामात मजुरी करतात आणि दगडकाम करणारा वडार समाज हे दगडापासून जातं, खलबत्ता, पाटा - वरवंटा अशा वस्तू बनविण्याचे काम करतात. दगडी वस्तू बनविण्यासाठी दुरवरुन हे दगड आणले जातात. कोणत्या दगडापासून कोणती वस्तू घडवता यईल याचा अंदाज घेऊन दगड निवडले जातात. नंतर त्या दगडांना आकारानुसार छोट्या मोठ्या वस्तू तयार केल्या जातात. यामध्ये पाटा - वरवंटा 400 ते 500 रुपये, खलबत्ता 200 ते 300 रुपये, जातं 1 हजार ते दीड हजार रुपयांपर्यंत विकले जाते.

### लग्नकार्य, शोभेच्या वस्तूंसाठी उपयोग

लग्नकार्य म्हटले की, आजही जात्यावर हळद दळली जाते. पण जात्याचा वापर कमी झाल्याने ऐनवेळी जातं आणायचं कुठून ? असा प्रश्न पडतो. काही अपवाद सोडला तर एखाद्याच्या घरात जातं जपून ठेवले जाते. पण लग्नसराईमध्ये जातं उपलब्ध होणे कठीण असते. अशावेळी नागरिक जात्याची खरेदी करतात. तसेच लग्नात रुखवतासाठी खलबत्ता, दगडाचे तुळशी वृंदावन, छोट्या आकारातील पाटा वरवंटा यांची खरेदी केली जाते. पूर्वी जात्यावर धान्य दळून भाकरी करायचे. आता पिठाच्या गिरण्या आल्या. मिक्सर आले आणि आमच्या व्यवसायाला घरघर लागली. आता केवळ लग्नसराईत या वस्तूंना मागणी असते. त्यामुळे थोडाफार व्यवसाय होतो, असे काही वडर समाज बांधवानी सांगितले.



# विद्यापीठाच्या परिक्षेत विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे सुयश

## बीएजेएमसीचे विद्यार्थी सुवर्ण आणि रौप्य पदकाने सन्मानित

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि. 1 )** – स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट सायन्स अँड आर्ट्सच्या विद्यार्थ्यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने घेतलेल्या परिक्षेत नेत्रदीपक यश संपादन केले आहे. कु. आश्विनी धनराज कुरवाडे हिने उन्हाळी 2024 परीक्षेत जनसंवाद व पत्रकारिता विद्या विभागातून गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक पटकाविला तर कु. पायल साहेबराव नांदने ती द्वितीय क्रमांकाची मानकरी ठरली.




विद्यापीठाच्या 41 व्या दीक्षांत समारंभात अश्विनी कुरवाडे हिला स्व. जवाहरलाल दर्डा सुवर्ण पदकाने सन्मानित करण्यात आले. कु. पायल साहेबराव नांदने हिचा रौप्य पदक देवून गौरव करण्यात आला. सलग चार वर्षापासून स्वामी विवेकानंद कॉलेजमधील बीएजेएमसी विभागातून गुणवत्ता यादीत येण्याचे विद्यार्थ्यांची परंपरा आहे. यात तीन सुवर्ण तर दोन रौप्य पदक विद्यार्थ्यांनी प्राप्त केली आहेत. आश्विनी कुरवाडे आणि पायल नांदणे या दोन्ही विद्यार्थिनी हातूर्णा या गावातील रहिवासी आहेत. त्यांनी जिद्द आणि परिश्रमातून हे यश प्राप्त केले आहे. दोघींचेही महाविद्यालयाच्या संचालिका प्राची ठाकरे यांनी कौतुक केले. तसेच कॉलेजचे प्राचार्य डॉ. बी. एस. झरे, बीएजेएमसी विभागप्रमुख अमरदीप खाडे, प्रा. राहुल शिवारे, प्रा. राजकुमार वानखडे, प्रा. प्रणिता शंकरपाडे आणि कॉलेजमधील सर्वच शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.